सूचना का अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२२/M/०००३२४**

**अपिलार्थी श्री. तुळशीदास मुरारी कवाळे**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रबंधक**
लोकआयुक्त आणि उप लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,
१ ला मजला, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई -४०० ०३२.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रबंधक**
लोकआयुक्त आणि उप लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,
१ ला मजला, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई -४०० ०३२.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ११.०७.२०२४**

अपीलकर्ता : अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. ०४.०७.२०२४ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.)
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २३.०८.२०२१ | २८.०९.२०२१ | ०६.१०.२०२१ | २२.११.२०२१ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०७.०१.२०२२ रोजीच्या अर्जान्वये माहिती दिली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. २८.०९.२०२१ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. २२.११.२०२१ संलग्न केले आहेत.

अपिलार्थी यांनी दि. २३.०८.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार त्यांचे सेवानिवृत्ती नंतर निवृत्ती वेतनातून जादा कपात केलेली रक्कम पुन्हा जमा होण्यासाठी केलेली कार्यवाहीची माहिती विचारली होती. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना कळविले की, सदर तक्रार अधिकारकक्षे अभावी निकाली काढण्यात आली असून तसे आपणास दि. २१.०९.२०२१ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. तसेच, सदर तक्रार अर्जाची प्रत समदिनांकाच्या पत्रान्वये सचिव, महाराष्ट्र शासन, मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे आपणास परस्पर उत्तर देण्यासाठी पाठविण्यात आली आहे. अपिलार्थींचे सदर उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी दि. ०६.१०.२०२१ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २२.११.२०२१ रोजी अपिलकर्ता यांनी त्यांच्या लेखी युक्तिवादात मा. लोक आयुक्तांनी

..२/-

माहितीच्या अधिकाराखालील अर्ज व अपील विचारात घेऊन त्यांच्या तक्रारीबाबत चौकशी/ कार्यवाही करावी अशी जी विनंती केलेली आहे ती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २(च) मध्ये वर्णन केलेल्या माहिती या संज्ञेत मोडत नाही असे नमुद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अपील खारीज केले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे निवेदन दि. १०.०७.२०२४ आयोगास सादर केले. ते अभिलेखावर घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित असून त्यांनी असे सादर केले की, अपिलार्थींना या प्रकरणात चौकशी/ कार्यवाही करावी अशी माहिती अपेक्षित आहे. जे की, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ शी सुसंगत नाही. सदर प्रकरण मा. उप लोक आयुक्त यांचे आदेशानुसार बंद करण्यात आले आहे. त्याप्रमाणे अपिलार्थींना संबंधीत तक्रार नस्तीमध्ये कळविण्यात आले आहे. सदर तक्रार नस्तीवर उपलब्ध असलेली सर्व माहिती तत्कालिन जन माहिती अधिकारी यांनी यापुर्वीच अपिलार्थींना दिलेली आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना माहिती दिलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission
Greater Mumbai

(Signature) 11-7-2024

**मुंबई** **(डॉ. प्रदीप व्यास)**
**दिनांक : ११.०७.२०२४** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**